कोर्ट कॉपी

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

राज्य State: महाराष्ट्र जिल्हा District: मुंबई पोलीस ठाणे Police Station: ॲसीबी पहिली खबर क्र. FIR No.: 25 वर्ष Year: 2025 दिनांक Date: 04/09/2025

(i) अधिनियम Act: भ्र.प्र.अधि. १९८८ कलमे Sections: 7, 12

(ii) अधिनियम Act .................. कलमे Sections ..................

(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ..................

11. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day .......... तारीख पासून Date from 04/09/25 वेळ Time .......... तारीख पर्यंत Date to 04/09/25 वेळ Time 16.00 वा. पर्यंत

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

12. (1) ००.०० ते ०३.०० (2) ०३.०० ते ०६.०० (3) ०६.०० ते ०९.०० (4) ०९.०० ते १२.०० (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.०० (7) १८.०० ते २१.०० (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 02/09/2025 वेळ Time 16.20 वा.

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 05/25 तारीख Date 04/09/2025 वेळ Time 08.10 वा.

माहितीचा प्रकार Type of Information: लेखी तक्रार लेखी / तोंडी Written / Oral: लेखी

13. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. .................. चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O. P. Name and No. ..................

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name "एम/पश्चिम" ठिकाणाचे नंबर No. if any बृहन्मुंबई महानगरपालिका वार्ड Ward .......... रस्त्याचे नाव Name of road चेंबूर मुंबई

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place .......... गाव Village .......... पोस्ट Post .......... तालुका Taluka .......... जिल्हा Dist. .......... राज्य State ..........

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station .......... तालुका Taluka .......... जिल्हा Dist. .......... राज्य State ..........

14. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name: सागर अरगडे (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name: विठ्ठल अरगडे

(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age: 35 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय फोन नं. Phone No.: 7038250707

(e) पारपत्र क्रमांक Passport No. .......... दिल्याचा दिनांक Date of issue .......... दिल्याचे ठिकाण Place of Issue .......... (f) व्यवसाय Occupation: नोकरी पो. निरिक्षक

(g) धर्म Religion: हिंदू जात Caste .......... जनजात Sub-Caste ..........

(h) पत्ता Address .......... गल्ली/सर्व्हे नं. Ward .......... घर/नाव नं. House Name No. .......... फोन/मो. नं. Phone No. .......... पॅन नं. Pan No. .......... वोटर्स नं. Card No. ..........

रस्त्याचे नाव Road: "ल" विभाग जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place: वरळी पोलीस कॅम्प, वरळी, मुंबई गाव Village पोस्ट Post: 400030 पो. स्टे. P. Stn. ..........

तालुका Taluka .......... जिल्हा Dist. .......... राज्य State .......... सध्याचा पत्ता Present Address ..........

15. 7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

① रमेश श्रीपाळ साळवे, वय-५७ वर्षे, अनुज्ञापन निरीक्षक, म.न.पा. बृहन्मुंबई, चेंबूर, मुंबई

② विजय सिताराम ठाकरे वय-३० वर्षे, गाडाऊन लिपीक, म.न.पा. बृहन्मुंबई, चेंबूर, मुंबई.

फिर्यादी यांचा जबाब स्वतंत्र पानावर नोंद केला असून हिच गुन्ह्याची पहिली खबर म्हणून संबोधण्यात येत आहे.

समक्ष

पोलीस निरीक्षक
ला.प्र.वि. मुंबई.

(सागर आरगडे)
पोलीस निरीक्षक

फिर्याद

दिनांक ०५/०९/२०२६

मी, सागर विठ्ठल आरगडे, वय : ३५ वर्षे, व्यवसाय : नोकरी (पोलीस निरीक्षक), नेमणुक – लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, मुंबई, मोबाईल नंबर ७०३८२५०७०७ .

---

मी वरील प्रमाणे असून ऑगस्ट २०२५ पासून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे पोलीस निरीक्षक (एटप) या पदावर नेमणुकीस आहे.

दिनांक ०२/०९/२०२६ रोजी मी कार्यालयात कर्तव्यावर हजर असताना, मा. अपर पोलीस आयुक्त, ला.प्र.वि. मुंबई यांचेकडील पडताळणी कारवाई क्रमांक ६३/२०२६ मध्ये पडताळणी व सापळा कारवाईकरीता चौकशी अधिकारी म्हणून माझी व पर्यवेक्षण अधिकारी म्हणुन सहाय्यक पोलीस आयुक्त, शुभदा मोरे यांची नेमणुक केल्याबाबत आदेश मिळाला. नमुद पडताळणी मधील तक्रारदार रसुल हसमत खान, वय ३६ वर्षे, धंदा – हातगाडी दुरूस्ती व विक्री, रा.ठि. : रूम नं. १२४, शिवशक्ती नगर, बंटर भवन रोड, बरमा सेल, रेल्वे लाईन, चुनाभट्टी, मुंबई ४०० ०२२ असे आहे. तक्रारदार रसुल हसमत खान यांचेकडे त्यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने त्यांचेकडे विचारणा केली तेव्हा तक्रारदार यांनी सांगितले की, तक्रारदार हे मागील १० वर्षापासुन हातगाडी दुरूस्ती व विक्रीचा तसेच हातगाडी भाडयाने देण्याचा व्यवसाय करत आहेत. तक्रारदार हे बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत हातगाडी व भंगार यांचे होणारे लिलाव यांच्यामध्ये बोली लावून होणाऱ्या लिलावातून हातगाडी व भंगार विकत घेत असतात.

दिनांक ०१/०९/२०२६ रोजी एम/पश्चिम वॉर्ड, लायसन्स विभाग, चेंबुर, मुंबई येथे हातगाडी व भंगार यांचा लिलाव असल्याबाबत तक्रारदार यांना समजले. त्यानुसार दिनांक ०१/०९/२०२६ रोजी तक्रारदार यांनी एम/पश्चिम वॉर्ड, लायसन्स विभाग, चेंबुर, मुंबई येथे जावुन लिलावामध्ये सहभाग घेतला.

तक्रारदार यांनी लिलावाची बोलणी केले तो विभाग अनुज्ञापन व अतिक्रमणचा अतिरिक्त चार्ज हा वरिष्ठ निरीक्षक श्री. रमेश साळवे यांचेकडे असल्याने श्री. साळवे यांनी तक्रारदार यांना एम/पश्चिम वॉर्ड, लायसन्स विभाग, चेंबुर, मुंबई येथे त्यांचे केबीन मध्ये बोलावुन घेतल्यामुळे तक्रारदार हे लोकसेवक श्री साळवे यांचे केबिन मध्ये गेले असता लोकसेवक श्री.साळवे यांनी तक्रारदार रसुल खान यांना सदर लिलावातील माल गोडावुन मधुन काढुन देण्यासाठी रू. ८०,१६४/– ची शासकीय फी भरण्यास सांगितली व रू. १,७०,०००/– इतकी रक्कम लोकसेवक हयांनी स्वत: करीता मागितली. त्यावेळी श्री.विजय ठाकरे गोडावुन क्लार्क हे देखील तेथे उपस्थित होते. त्यानंतर श्री.साळवे यांनी सांगितल्याप्रमाणे तक्रारदार रसुल खान यांनी एम / पश्चिम वॉर्ड, चेंबुर, मुंबई येथे सदर लिलावाची रक्कम रोखीने भरून त्याबाबत पावती घेतली.

लोकसेवक यांनी तक्रारदार रसुल खान यांचेकडे मागणी केलेली रू १,७०,०००/– ही रक्कम कोणतेही शासकीय शुल्क नसुन ते त्यांनी स्वत:साठी मागितले असल्याने तक्रारदार यांना सदरची लाच रक्कम लोकसेवक यांस देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदार यांनी दिनांक ०२/०९/२०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे समक्ष येवुन लेखी तक्रार दिली.

दिनांक ०२/०९/२०२६ रोजी तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने पुढील कारवाईकरीता शासकीय पंचांची आवश्यकता असल्याने प्रभारी अंमलदार पो.ह. ९६०२६४/ शेमडकर यांच्यामार्फतीने दोन शासकीय पंच नामे १) श्री. प्रशांत महावीर भस्मे, वय ३४ वर्षे, धंदा– नोकरी (सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक), प्रादेशिक परिवहन कार्यालय, १११/डी, आंबिवली व्हिलेज, अंधेरी, मुंबई ४०००५३, रा.ठि. – सी /२०१, रतन नगर वर्सोवा को.ऑप.हौ. सोसायटी, बिल्डींग नं. ०७, रतन नगर लेन, वर्सोवा, अंधेरी प. मुंबई ४०० ०५३ मोबाईल क्र.९९७०१८९७९१, आधार कार्ड क्र. ६१७९९२३४२१६२, २) श्रीमती प्रिती प्रकाश गायकवाड, वय ३२ वर्षे, धंदा– नोकरी (सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक), प्रादेशिक परिवहन कार्यालय, १११/डी, आंबिवली व्हिलेज, अंधेरी, मुंबई ४०००५३. रा.ठि.– फ्लॅट ६०१, मृदुल हाईटस को.ऑप.हौ.सोसायटी, आय. सी. कॉलनी, बोरीवली प. मुंबई – ४०० १०३, मो.क्र. ९९७५०९११९५, आधार कार्ड क्र. ९३६१०८०४६६०५. यांना पाचारण केले. दोन्ही पंच कार्यालयात हजर झाल्यानंतर प्रथम त्यांना आम्ही आमची व तक्रारदार यांची

(अमोल ओंबासे)
पो.नि.लाप्रवि

ANTI-CORRUPTION BUREAU MUMBAI

(सागर आरगडे)
पोलिस निरिक्षक

ओळख करुन दिली. तसेच तक्रारदार यांचे तक्रारीविषयी थोडक्यात हकिगत सांगून तक्रारदार यांचा तक्रारी अर्ज पंचांना वाचण्यास दिला. तक्रारी अर्ज पंचांनी वाचून झाल्यानंतर त्यावर समक्ष म्हणून आम्ही व पर्यवेक्षण अधिकारी म्हणून सपोआ शुभदा मोरे तसेच दोन्ही पंचानी स्वाक्षरी करून सदरचा अर्ज आमचे ताब्यात घेतला. तद्नंतर सपोआ मोरे यांनी पंचासमक्ष सांगितले की, लोकसेवक यांनी केलेल्या लाचेच्या मागणीसंदर्भात पडताळणी करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने तक्रारदार रसुल हसमत खान हे लोकसेवक यांची त्यांच्या कार्यालयात जावुन प्रत्यक्ष भेट घेणार आहेत. तक्रारदार हे ला.प्र.वि. मुंबई कार्यालयास सायंकाळी उशीरा आल्याने तसेच तक्रारदार यांचेकडे विचारणा केली असता उशिर झाला असलेने आता लोकसेवक यांची भेट होणार नसलेबाबतची माहिती पंचासमक्ष तक्रारदार यांनी दिल्याने दिनांक ०३/०९/२०२६ रोजी पडताळणी कारवाई करण्याचे ठरले.

दिनांक ०३/०९/२०२६ रोजी १५:४५ वा. तक्रारदार, दोन पंच व आम्ही पडताळणी पथक असे लाप्रवि कार्यालयातून पडताळणी कारवाईकरीता कार्यालयाच्या बाहेर उभ्या असलेल्या दोन शासकीय वाहनाने लोकसेवक यांचे कार्यालयाच्या दिशेने रवाना झालो. शासकीय वाहन क्र. १ मध्ये आम्ही, पंच व तक्रारदार असे लोकसेवक यांचे कार्यालयापासून काही अंतरावर के स्टार मॉल पार्किंग, चेंबुर या परिसरात आल्यानंतर १६:३० वा. दरम्यान शासकीय वाहन थांबविले. तसेच मी शासकीय वाहन क्र. २ मधील पथकास फाईन ऑर्ट गॅलेरी, चेंबुर या परिसरात जावून थांबण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर १७:०२ वाजता डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून आम्ही स्वत: तक्रारदार यांच्या शर्टच्या आतील बनियनला कोणास दिसणार नाही किंवा संशय येणार नाही, अशा पध्दतीने अडकविला. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. ०१ श्री. प्रशांत भस्मे हे लोकसेवक यांना भेटण्यासाठी त्यांचे कार्यालयाच्या दिशेने रवाना केले व उर्वरीत पथक शासकीय वाहना जवळच थांबले.

सायंकाळी १७.४५ वा. तक्रारदार व पंच श्री. भस्मे हे शासकीय वाहनाजवळ परत आले. सदरवेळी तक्रारदार यांचेकडे विचारणा केली असता त्यांनी सांगीतले की, तक्रारदार यांना लोकसेवक साळवे यांनी कॅल्क्युलेटरवरती ८० हा अंक दाखविला त्यावेळी तक्रारदार यांनी साळवे यांना **'क्या अस्सी रूपया दु?' त्यावेळेस लोकसेवक साळवे यांनी तक्रारदार यांना "बार बार क्या बताऊ. सांगा तुम्ही, सगळ सगळ ह्यांना खुल सांगायला लागत, या लोकांना. फटक से, मुझे ये सब पसंद नही. ये सब चीजे, अभी कुछ बोल ही मत. तेरे वजह से मॅनेजमेंट गडबड हो जाता है.**
**(लोकसेवक साळवे यांनी लोकसेवक ठाकरे यांना मोबाईलवर कॉल केला असता, त्यादरम्यान झालेले) मनोज आणि रसुल येणार आहे त्यांना कोऑपरेट करा. हा. ठिक आहे.''** असे लोकसेवक साळवे व ठाकरे यांच्यात संभाषण झाले. सदरबाबत कारवाई दरम्यान ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण ऐकले असता, वरीलप्रमाणे समजून आले. त्यामुळे तक्रारदार यांस लोकसेवक विजय ठाकरे यांची भेट घेण्यासाठी पंच श्री भस्मे यांचे सोबत माहुलगाव गोडावुन, अति. निमुर्लन मनपा., चेंबुर, मुंबई या कार्यालयात पाठविले.

सायंकाळी १९.५७ वा. तक्रारदार व पंच श्री. भस्मे हे शासकीय वाहनाजवळ परत आले. सदरवेळी तक्रारदार यांचेकडे विचारणा केली असता त्यांनी सांगीतले कि, लोकसेवक ठाकरे व तक्रारदार खान यांची भेट झाली असून, सदरवेळी भेटीदरम्यान तक्रारदार यांनी त्यांचा माल घेऊन जाण्यासाठी गाडी कधी घेऊन येऊ अशी लोकसेवक यांना विचारणा केली असता, त्यावेळी लोकसेवक यांनी " **मतलब पैसा देंगे तो कल माल निकलेगा ना बोल रहे थे वो.'** त्यावर तक्रारदार लोकसेवक ठाकरे यांस बोलले की, **'अरे अस्सी हजार का बात हुआ.' 'हा पुछो उनको'** त्यावर लोकसेवक ठाकरे यांनी लोकसेवक साळवे यांच्या मोबाईलवर कॉल केला असता लोकसेवक साळवे यांनी कॉल उचलला नाही. त्यावर लोकसेवक तक्रारदार यांस बोलेले की, **' नही उठाया. नही उठायेंगे, पता है मुझे. अस्सी बोला है ना पक्का?'** त्यावर तक्रारदार लोकसेवक ठाकरे यांस बोलले की, **' अस्सी हजार का बात हुआ. अस्सी हजार मे बात हुआ. बोले की बाकी दो दिन बाद देना. तो इसके वजह से मै बोला की मै लाके देता हु और कल सुबह कितने बजे गाडी लाऊ? '** त्यावर लोकसेवक ठाकरे तक्रारदार यांस म्हणाले की, **' बारा के बाद ही ' ' सुबह मुझे उधर इलेक्शन मे जाना है '** त्यावर तक्रारदार लोकसेवक ठाकरे यांना बोललो की, **' और बाकी का दो तीन दिन का टाईम, अस्सी के बाद कितना? कितना बचेगा? '** त्यावर लोकसेवक ठाकरे बोलले की, **'अस्सी बचेगा. '** त्यावर तक्रारदार लोकसेवक ठाकरे यांना बोलला की, **' अस्सी बचेगा? अस्सी हजार बचेगा क्या नब्बे हजार बचेगा?**

INSPECTOR OF POLICE
सत्यमेव जयते
MUMBAI
ANTI-CORRUPTION BUREAU

**एक सत्तर है ना? अपुन ने ढाई लाख रूपये का बात हुआ.' ' और उसके बाद मे अस्सी हजार रूपया की पावती भरी '** त्यावर लोकसेवक ठाकरे बोलले की, **'एक सत्तर बचा लोकसेवक ठाकरे व तक्रारदार यांच्यात** लाचेच्या मागणीला होकार दिला. अशी लोकसेवक ठाकरे व तक्रारदार खान यांच्यात चर्चा झाल्याचे तक्रारदार यांनी सांगीतले. सदरबाबत कारवाई दरम्यान ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण ऐकले असता, वरीलप्रमाणे समजून आले. त्यानंतर आम्ही सर्व शासकीय वाहनाने लाप्रवि कार्यालयात परत आलो.

सदर पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक विजय ठाकरे यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केल्याचे तसेच सदर लाचेची रक्कम दिनांक ०४/०९/२०२६ रोजी घेऊन येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाल्याने मी व सपोआ शुभदा मोरे यांनी पडताळणी पथक, पंच व तक्रारदार यांना गोपनियतेच्या सुचना दिल्या. दिनांक ०३/०९/२०२६ रोजीची पडताळणी कारवाई स्थगित करण्यात आली व दिनांक ०४/०९/२०२६ रोजी लाप्रवि कार्यालय येथे हजर राहण्याबाबत सांगीतले.

दिनांक ०४/०९/२०२६ रोजी सकाळी ११:५५ वाजता तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने पुढील सापळापुर्व/सापळा कारवाईकरीता देण्यात आलेल्या सुचनेप्रमाणे पंच व पथक असे लाप्रवि कार्यालयात हजर झाले. त्यावेळी तक्रारदार यांना फोन करून सी.आय.एस.एफ. कॅटीन, वाशी गाव, चेंबुर या ठिकाणी येण्यास सांगितले. आम्ही, सपोआ मोरे, सापळा पथक व पंच असे ला.प्र.वि. कार्यालयातून सापळा कारवाईकरीता कार्यालयाच्या बाहेर उभ्या असलेल्या दोन शासकीय वाहनाने लोकसेवक यांचे कार्यालयाच्या दिशेने रवाना झालो. मी दिलेल्या सुचनेप्रमाणे सी.आय.एस.एफ. कॅटीन, वाशी गाव, चेंबुर या परिसरात आल्यानंतर दोन्ही शासकीय वाहन थांबविण्यात आले. त्यानंतर सपोआ मोरे यांनी तक्रारदार खान यांस फोन कॉल करून बोलावून घेतले असता ते त्यांच्या मोटारसायकल वरून सी.आय.एस.एफ. कॅटीन, वाशी गाव, चेंबुर या ठिकाणी आले. त्यानंतर दोन्ही पंच व सापळा पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देण्यात आल्या.

आम्ही तक्रारदार यांना लाचेच्या रक्कमे बाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी त्यांचेकडील बचतीतील रूपये ८०,०००/— इतकी रक्कम घेवुन आल्याचे सांगितले. तक्रारदार यांचेकडील उपलब्ध लाचेची रक्कम रू. ८०,०००/— (त्यामध्ये रू. ५००/— दराच्या भारतीय चलनाच्या १६० नोटा) यांचे पंचासमक्ष मोबाईलमध्ये फोटो काढण्यात आले. पो.नि. आरगडे यांनी पंच व तक्रारदार यांना अॅन्थ्रोसिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगितले. पोशिचा. साबळे यांनी लाच म्हणून वापरण्यात येणाऱ्या रूपये ८०,०००/— (त्यामध्ये रू. ५००/— दराच्या भारतीय चलनाच्या १८० नोटा) रक्कमेच्या नोटांना अॅन्थ्रोसिन पावडर लावून ती लाचेची रक्कम तक्रारदार रसुल खान यांनी परिधान केलेल्या पॅन्टचे डाव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवली त्यावेळी पोशिचा साबळे हे सापळा कारवाईमध्ये प्रत्यक्ष भाग घेणार नसल्याचे सांगितले. तसेच लोकसेवक यांनी लाच स्विकारल्यानंतर तक्रारदार यांनी हातरूमाल चेहऱ्यावर फिरवून सापळा पथकाला दिसेल असा लाच स्विकारल्याचा इशारा करावा व सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार यांना एकत्र करून आम्ही खबरदारीच्या सुचना दिल्या.

मी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तक्रारदार यांनी परिधान केलेल्या शर्टाच्या आतील बाजुस बनियानला कोणास दिसणार नाही किंवा संशय येणार नाही अशा पध्दतीने अडकविला. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.०१ श्री. प्रशांत भस्मे हे लोकसेवक यांना प्रत्यक्ष भेटण्यासाठी लोकसेवक यांच्या माहुलगाव गोडावुन, अति. निमुर्लन मनपा., चेंबुर, मुंबई या कार्यालयाच्या दिशेने रवाना झाले. त्यांच्या मागोमाग आम्ही पथक व पंच क्र.०२ श्रीमती प्रिती गायकवाड असे चालत गेलो. पो. नि. पिसाळ व उर्वरीत सापळा पथक यांना एम/ पश्चिम वॉर्ड, चेंबुर, मुंबई कार्यालयाच्या आवारात जाण्यास सांगुन त्यांचेवरती कोणासही संशय येणार नाही अशा प्रकारे थांबून राहण्यास सांगीतले.

काही वेळाने तक्रारदार रसुल खान व लोकसेवक विजय ठाकरे हे माहुलगाव गोडावुन, अति. निमुर्लन मनपा., चेंबुर, येथील चौकीच्या बाहेर आले त्यावेळी तक्रारदार खान यांनी सापळा पथकास दिसेल अशाप्रकारे लाचेची रक्कम स्विकारल्याबाबत पुर्व नियोजीत इशारा केला. त्यानंतर लगेच मी व सोबतच्या सापळा पथकाने लागलीच लोकसेवक विजय ठाकरे यांना चौकीच्या बाहेर ताब्यात घेतले.

मी लोकसेवक विजय सिताराम ठाकरे यांस पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता त्यांनी बाळासाहेब राजाराम घाडगे यांचेकडे लाचेची रक्कम दिली असल्याचे सांगितले. त्यानंतर

(अमोल ओंबळे)
पो.नि. ला.प्र.वि.

ANTI-CORRUPTION BUREAU
MUMBAI

(सागर आरगडे)
पोलिस निरीक्षक

मी लोकसेवक विजय ठाकरे, पंच असे चौकीमध्ये गेलो असता घाडगे यांनी आम्हाला बघून ते बसलेल्या सिंगल बेडच्या खाली ठेवली असल्याचे सांगीतले. त्यानंतर मी पंचासमक्ष बाळासाहेब घाडगे यांना सदर रक्कमेबाबत विचारणा केली असता त्यांनी सदरची रक्कम ही विजय ठाकरे यांच्या सांगण्यावरून तक्रारदार रसुल खान यांच्याकडुन घेतली असल्याचे सांगितले. त्या ठेवलेल्या रक्कमेची पंचासमक्ष पहाणी केली असता सदर लाचेच्या रक्कमेवरील व मोबाईलमध्ये फोटो काढण्यात आलेल्या लाचेच्या रकमेवरील क्रमांक एकच असल्याचे दिसुन आले.

त्यावेळी तक्रारदार रसुल खान यांचेकडे विचारले असता त्यांनी सांगितले की, लोकसेवक विजय ठाकरे यांचे सांगणेवरून टेम्पो चालक बाळासाहेब घाडगे (खाजगी इसम) यांनी लाचेची रक्कम दिली . त्यावेळी आम्ही व पथकाने लोकसेवक विजय ठाकरे व टेम्पो चालक बाळासाहेब घाडगे (खाजगी इसम) यांना १३.३६ वा. ताब्यात घेतले. सदरवेळी त्यांना त्याचे नाव व पत्ता विचारले असता, त्यांनी त्याचे नाव विजय सिताराम ठाकरे, वय ३० वर्षे, पद – कार्यकारी सहाय्यक, एम/पश्चिम वॉर्ड, लायसन विभाग (अति. निर्मुलन) मनपा, चेंबुर, मुंबई. रा.ठि. २०८, सोनु प्लाझा बिल्डींग, हनुमान मंदिर जवळ, दिवा प. ठाणे व टेम्पो चालक यांनी त्यांचे नाव बाळासाहेब राजाराम घाडगे, वय ५५ वर्षे रा.ठि. – बोरबादेवी नगर, सायन ट्रॉम्बे रोड, गोंवडी, मुंबई असे सांगितले.

मी लोकसेवक विजय ठाकरे यांना पंचासमक्ष लोकसेवक साळवे यांस फोन करण्यास सांगितले असता त्यांनी त्यांच्या ७९७७९०७८१५ या मोबाईल क्रमांकावरून लोकसेवक साळवे यांच्या ९८६९४२७७२४ या मोबाईल क्रमांकावर कॉल केला. त्यावेळी लोकसेवक ठाकरे यांनी साळवे यांना, **'साहेब रसुलने आणून दिले ऐंशी हजार रुपये असे सांगितले. त्यावर लोकसेवक साळवे यांनी, हा व्यवस्थित ते ऑक्शनमध्ये हे करून टाका सगळं ऑक्शन हा असे निर्देश दिले. यावर लोकसेवक ठाकरे यांनी, बाळू बाळुकडे दिले आणून त्यांनी असे सांगून त्यास हा ठिक आहे असे बोलुन दुजोरा दिला.** हे संपूर्ण संभाषण डिजिटल व्हॉइस रेकॉर्डरमधील मेमरी कार्डमध्ये रेकॉर्ड करण्यात आले.

सदर लाच घेण्यास रमेश साळवे यांनी दुजोरा दिल्यामुळे त्यांचा सहभाग निष्पण्ण झाल्याने पोनि पिसाळ व पथक यांस फोन करून लोकसेवक साळवे यांना ताब्यात घेण्यास सांगीतले असता त्यांनी रमेश साळवे यांना १४:२२ वा. ताब्यात घेतले. त्यानंतर आम्ही लोकसेवक विजय ठाकरे व बाळासाहेब घाडगे यांना घेवुन एम पश्चिम वॉर्ड, चेंबुर येथे गेलो. त्यानंतर लोकसेवक रमेश गोपाळ साळवे, लोकसेवक विजय सिताराम ठाकरे व (खाजगी इसम) बाळासाहेब घाडगे यांचेसह लाप्रवि कार्यालयात परत आलो व सापळा कारवाईबाबत सविस्तर पंचनामा केला.

तरी दिनांक ०३/०९/२०२६ रोजीची पडताळणी, आणि दि. ०४/०९/२०२६ रोजी केलेल्या सापळापुर्व/सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार रसुल खान यांचेकडे एम/पश्चिम वॉर्ड, चेंबूर, मुंबई येथे झालेल्या हातगाडी व भंगाराच्या लिलावामधील माल गोडाऊन मधून बाहेर काढून देण्याकरता लोकसेवक श्री विजय ठाकरे व लोकसेवक रमेश साळवे यांनी शासकीय फी रू. ८०,१६४/– भरण्यास सांगुन रू. १,७०,०००/– हे लोकसेवक हयांनी स्वत: करीता मागितले. तसेच सदरच्या लाचेच्या रक्कमेपैकी पहिला हफ्ता रूपये ८०,०००/– रक्कम लोकसेवक विजय सिताराम ठाकरे यांच्या सांगण्यावरून (खाजगी इसम) बाळासाहेब घाडगे टेम्पो चालक यांचेंकडे दिली व त्याबाबत लोकसेवक रमेश गोपाळ साळवे यांना मोबाईल श्री ठाकरे यांनी फोनव्दारे माहिती दिली असता, त्यांनी त्यास होकार देऊन अनुमोदन दिले म्हणुन माझी लोकसेवक रमेश गोपाळ साळवे व लोकसेवक विजय सिताराम ठाकरे, दोन्ही नेमणुक अनुज्ञापन खाते, अतिरिक्त कार्यभार अतिक्रमण विभाग, एम/पश्चिम वॉर्ड, मनपा, चेंबूर, मुंबई यांच्याविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७, १२ अन्वये सरकारतर्फे कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष,

(अमोल आंबवणे )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

INSPECTOR OF POLICE
सत्यमेव जयते
MUMBAI
ANTI-CORRUPTION BUREAU

( सागर आरकाटे )
पोलिस निरीक्षक

फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ तात्काळ

...ons for delay in reporting by the complainant/informant

...गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

...iculars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

—

चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........ —

Total Value of properties stolen / involved

...) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

...कस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........ —

...nnatural / Accidental Death Case No., if any.

...हिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद ता.वे.व ठिकाणी तक्रारदार यांचेकडे एम वॉर्ड पश्चिम चेंबूर मुंबई येथील झालेल्या
इतगाडी व भंगाराच्या लिलावामधील माल गोडाऊन मधून बाहेर काढून देण्याकरिता पडताळणी दरम्यान
कलम 7 मधील लोकसेवक साळवे यांचे सांगण्यावरून लोकसेवक ठाकरे यांनी शासकीय फि व्यतिरिक्त
रु. 1,00,000/- इतक्या लाचेच्या रकमेची मागणी करून त्यापैकी पहिला हप्ता 20,000/- रु. स्विकारल्याने
सापळा कारवाई दरम्यान आलोसे क्र. 2 ठाकरे यांना ताब्यात घेतले म्हणून कलम 7, 12 अन्वये
गुन्हा नोंद

**केलेली कार्यवाही** –1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या ........

तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : ........

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ........

........ जिल्हा ........ राज्य ........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) .............. Rank .............. No. ............
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ........

(3) Transferred to P. S. ........ on point of jurisdiction.
District ........

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

तक्रारदाराची सही व अंगठा [signature]

Signature and Thumb impression of the Complainant/Informant

INSPECTOR OF POLICE ANTI-CORRUPTION BUREAU

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ....अमोल अंबवणे....

पदनाम Rank ....पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. मुंबई

तपासिक अ. चा कोड क्र. ........

Posting

Code No. of I. O. ........

1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ........

1. Date and time of submitted to the Court ........

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत Copy to | 2 फिर्यादी, 2. Complainant, | 3. पोलीस अधीक्षक ( संगणक ), 3. Supdt. of Police (Computer), | 4. तपासिक अंमलदार, 4. Inv. Officer, | 5. स्थळ प्रत. 5. Office Copy. |

Attachment to item 7 of First Information Report